# प्रकरण तिसरे

# शिव - सटवाई आख्यायिकांच्या आशयाचे स्वरूप


३.१ प्रास्ताविक

३.२ मराठी लोककथा आणि दंतकथा (आख्यायिका)

३.२.१ आख्यायिका म्हणजे काय?

३.३ शिव - सटवाई आख्यायिकांच्या आशयाचे स्वरूप

३.३.१ माणकेश्वर परिसरातील आख्यायिका

३.३.२ स्थानिक आख्यायिका

३.३.३ पूजाविधी संदर्भातील आख्यायिका

३.३.४ ऐतिहासिक आख्यायिका

३.३.५ देवदेवतांविषयक पौराणिक आख्यायिका

३.३.६ भगतांची गद्यपद्यमिश्रित आख्यायिका

३.३.७ नवसपूर्तीच्या आख्यायिका

३.४ लिपीबद्ध कथा, आख्यायिका

३.५ समारोप

# प्रकरण तिसरे

# शिव - सटवाई आख्यायिकांच्या आशयाचे स्वरूप

## ३.१ प्रास्ताविक :

भारतीय समाज कथाप्रिय असून लोककथा, कहाण्या, कथागीते, दैवतकथा, व्रतकथा, आख्यान, आख्यायिकांचा समाजमन, लोकजीवनावरील प्रभाव प्राचीन काळापासून आजही टिकून असलेला दिसतो. लोककथा, आख्यायिका कथाकारांची परंपरा मौखिक रूपामध्ये अनादि काळापासून चालत आली असून आजही आजी आजोबांच्या पाठीमागे घरातील लहान मुलांचा चमू गोष्ट ऐकण्यासाठी आतूर असलेला आढळतो. बालकांची गोष्ट ऐकण्याची भूक एका कथेवर किंवा कहाणी सोबत संपते असे जाणवत नाही. 'अजून सांगा? दुसरी सांगा? राक्षसाची सांगा?' हा हट्ट पुरवावाच लागतो. समाजामध्ये असंख्य मौखिक स्वरूपातील तसेच लिपिबद्ध लोककथा आढळतात.

माणकेश्वर परिसरामध्येच राहत असल्याने अशा आख्यायिका नेहमी ऐकण्यास मिळत परंतु संशोधनाच्या निमित्ताने माणकेश्वर तसेच परिसरामध्ये भ्रमंती करताना वेळप्रसंगी शेतावर जाऊन शेतकरी, कामावरील स्त्रिया यांच्याशी तसेच भक्तांच्या संपर्कात आल्याने 'शिव-सटवाई' विषयक अनेक आख्यायिका मिळाल्या. त्या ध्वनिमुद्रणाच्या सहाय्याने लिपिबद्ध केल्या आहेत. देवतांच्या आख्यायिकांचा शोध घेताना काही लोकांना याबाबत माहिती नसलेली दिसली तर काहीनी चटकन स्वत: जवळचा मौखिक ठेवा सांगितला. येथील 'कोपराईच्या कथे' ची अनेक रुपे मिळाली. ह्या कथेने लोकमानसात घर केल्याचे आढळून आले.

## ३.२ मराठी लोककथा आणि दंतकथा (आख्यायिका) :

लोकवाङ्मयात लोककथांना विपुल लोकप्रियता लाभली आहे. लोककथा या मौखिक

परंपरेने अनादी काळापासून चालत आल्या असून त्यांना लोकसाहित्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. दंतकथा लोककथेचा एक प्रकार आहे. लोककथांचे आशयाच्या तसेच रचनेच्या अनुषंगाने वर्गीकरण करण्याचे प्राचीन व आर्वाचीन प्रयत्न अनेक अभ्यासकांनी केले असून हे वर्गीकरण अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. भारतातील प्राचीन आचार्यांनी कथांचे दोन विभाग केले असून एक कथा आणि दुसऱ्या आख्यायिका होय. लोककथांचे दैवतकथा, सृष्टी निर्मितीसंबंधी कथा, ~~व्रतकथा, रुढीकथा कहाण्या, स्पष्टीकरण, कथा उपदेश कथा~~, व्रतकथा, रुढीकथा, कहाण्या, स्पष्टीकरण कथा, उपेदश कथा, नीतिकथा, चातुर्यकथा, दंतकथा असे धर्म संबद्ध आणि धर्मेतर आशयानुसार वर्गीकरण डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी केले आहे.'[१] डॉ. शरद व्यवहारे यांनी रचनेच्या दृष्टीने लोककथांचे १) कथा, २) आख्यायिका, ३) गीतकथा आणि ४) कहाण्या असे चार भागात वर्गीकरण केले आहे. तसेच लोककथा, दंतकथा किंवा आख्यायिका आणि अनुभव कथा असे स्थूलमानाने लोककथांचे तीन प्रकार लिंडा डेघ (Linda Degh)[२] ह्यांनी मानले आहेत. दंतकथा ही पारिभाषिक संज्ञा ऐतिहासिक आख्यायिकांसाठी वापरली जाते. 'लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली अशी कथा जिचा आधार एखादी ऐतिहासिक घटना असते. मात्र मौखिक परंपरेमध्ये जिचे स्वरूप पूर्णपणे बदललेले असते. तिला दंतकथा म्हणतात'[३] ऐतिहासिक सत्य कल्पना व गुंठित स्वरूपात समाजमानसात दंतकथेच्या रूपाने जोपासले जाते सर जॉर्ज गॉम, स्टिथ थॉमसन ह्यांनी आख्यायिकांना आपल्या वर्गीकरणामध्ये स्थान दिले आहे.

अभ्यासकांच्या वर्गीकरणामुळे मनामध्ये गुंता आणि गोंधळ अधिकच वाढताना दिसतो. परंतु येथे वर्गीकरणासंदर्भातील विवेचन न करता आख्यायिका हा लोककथेचा एक प्रकार असून माणकेश्वर येथील शिव-सटवाई विषयीच्या विविध आख्यायिकांच्या संहितांचा आशय, आस्वादाचा आढावा वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने घेणे मला महत्त्वपूर्ण वाटते.

## ३.२.१ आख्यायिका म्हणजे काय ?

मराठी शब्दकोशातील अर्थानुसार 'आख्या' म्हणजे अखंड संपूर्ण आणि आख्यायिका म्हणजे दंतकथा होय.[४] जनश्रुतीच्या आधारावरील कल्पित गोष्ट, कथा, कहाणी, असाही अर्थ घेतला जातो. 'पारंपरिक गोष्ट म्हणजे आख्यायिका. आख्यायिकांना सत्य आणि कल्पित याचे मिश्रण झाल्याचे दिसते निरनिराळे लोकसमूह आपापल्या आख्यायिकातील कल्पिताची निर्मिती आणि स्वीकार श्रद्धेनेच करीत असतात आणि थोडे चिकित्सकपणे पाहिल्यास त्या कल्पितातून काही रूपकार्थ ही जाणवतो.'[५] रायगडाची हिरकणी, कोल्हापूर करवीर नगरी, छ. शाहू महाराज आणि त्यांच्या शिकारी कथा याविषयीच्या अनेक आख्यायिका ऐकावयास मिळतात.

'आख्यायिकेचा आधार एखादे सत्य असते. आख्यायिका इतिवृत्तात्मक असते. कोणत्या तरी होवून गेलेल्या घटनेवर आधारित असे तिचे स्वरूप असते.'[६] लीळाचरित्र ग्रंथातील श्रीचक्रधराविषयीच्या शिष्यांच्या आख्यायिका, संतचरित्र, शनिमहात्म्य, नवनाथ ग्रंथ, बखरीमधील आख्यायिका, पुराण, ज्ञानदेवांनी चालवलेली भिंत, त्यांनी रेड्याच्या मुखातून वेद वदविले, तसेच तुकारामांची इंद्रायणीत बुडविलेली अभंगांची पोथी जशीच्या तशी कोरडी वर येणे, पुष्पक विमान याविषयी वाङ्मयात असंख्य आख्यायिका आढळतात. महाभारतात एक तीळ सात जणांनी खाल्ल्याची आख्यायिका सुप्रसिद्ध आहे. बार्शीच्या भगवंताची आख्यायिका ।। श्री अंबरीष विजय ।। ग्रंथात आहे. शिखर शिंगणापूरचा महादेव, कोल्हापूरची महालक्ष्मी, ज्योतिर्लिंग, रेणुका, आरेवाडी जि. सांगली येथील बिरोबा अशी प्रतिष्ठा पावलेली दैवते, पुरलेले धन, सद्‌गुरू बाळूमामा, विशाळगड येथील दर्यातील रक्ताची विहीर, साखळीच्या कड्यात हात घालून खरं खोटं असा न्याय निवाडा करण्याविषयीच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. देवीचा प्रकोप टाळण्यासाठी कोकणातील अनेक गावात (वाघण) 'गावपळण' च्या संदर्भात आख्यायिका आजच्या वैज्ञानिक युगातही रूढ आहेत. अशा प्रादेशिक भागानुसार

असणाऱ्या असंख्य आख्यायिका लोकमानसावर कायमच्या शतकानुशतके चितारल्या गेल्या आहेत. अशा विधिकथा, कहाण्या, आख्यायिका, महात्म्य कथा गावोगावी प्रचलित असल्याचे दिसून येते इतिहासात होऊन गेलेल्या व्यक्ती मुख्यत: संत, वीरपुरूष, लोकोत्तर स्त्रिया, लोकनेते, देवदेवता यांच्याभोवती आख्यायिकांची गुंफण झालेली असते वरील अलौकिक व्यक्तीविषयी लोकसमूहास वाटणारा आदर आणि अभिमान अतिशयोक्तीच्या आणि अद्भुताच्या स्वरूपात आख्यायिकातून अविष्कृत होतो.

दंतकथेला इंग्रजीमध्ये 'Legends' संस्कृतमध्ये 'आख्यायिका' हिंदी भाषेत 'अवदान' अशी संज्ञा असली तरी जनमानसाच्या लोकभाषेत "आख्यायिका" हीच संज्ञा दृढ असल्याचे दिसून येते. 'शिव-सटवाई विषयी दंतकथा अशी आहे...' असे म्हणण्याऐवजी लोक, भगत, भक्त 'शिव-सटवाई विषयीची आख्यायिका अशी आहे ....' असे सहज बोलून जातात. आख्यायिका ही संज्ञा सर्वसामान्यापर्यंत पोहचलेली, त्यांच्या मनात रुजलेली दिसून आल्याने सदर प्रबंधिका लेखन विषयात 'आख्यायिका' या शब्दाचाच वापर करणे मला योग्य, उचित वाटते.

प्राचीन ठिकाण, नगरी, मंदिर बांधकाम, वास्तू, किल्ला, पूजाविधी, प्राणी, पक्षी, झाड, लोकसमुहामध्ये आख्यायिकांचे विषय बनतात. काही काळानंतर किल्लारीचा भूकंप, महापूर, सुनामी लाटा, मांढरदेवी, अक्षरधाम मंदिराची घटना ह्या घटनासुद्धा आख्यायिकांचा पेहराव परिधान करताना दिसतील. पूर्वी कधीतरी घडलेली सत्य घटना परंतु लोकभाषेमध्ये रूढ झाल्याने कालांतराने कल्पनाबंधाची अनेक वलये चिटकून आख्यायिकातील आशय संपूर्णत: सत्यच आहे असे म्हणता येत नाही.

ऐतिहासिक सत्य घटनाच दंतकथा किंवा आख्यायिका होऊ शकते असे नव्हे तर सामान्य व्यक्तिसुद्धा उल्लेखनीय कार्यामुळे कालांतराने लोकजीवनात आख्यायिकांचा विषय बनतात (उदा. - संत गोरोबा कुंभार, संत गाडगे महाराज, बाबा आमटे) आख्यायिकांची

व्याख्या करताना मला असे वाटते की, 'लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली, प्रसिद्ध अशी पारंपरिक गोष्ट, कहाणी, जिचा आधार एखादी घडलेली सत्य घटना-प्रसंग असतो, मात्र तीचा लवचिकता हा विशेष असल्यामुळे मौखिक परंपरेने (जनश्रृति) ती संक्रमित स्वरूपात नकळत बदलत असते तिला आख्यायिका म्हणावे.''

वरील विशेषांमुळे मराठी लोककथात आख्यायिका ही व्यापक संकल्पना ठरते.

## ३.३ शिव - सटवाई आख्यायिकांच्या आशयाचे स्वरूप :

लोककथेचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार म्हणून आख्यायिकांचा विचार येथे करावयाचा आहे. आख्यायिका मौखिक स्वरूपात चालत आलेल्या असून कथनकार आपल्या नवनवोन्मेषप्रतिभा शैलीने मूळच्या कथेला कल्पनेचे वस्त्र परिधान करीत असतो. त्यामुळे मूळचे सत्य शोधताना संशोधकाला खूप परिश्रम घ्यावे लागतात.

आख्यायिका मूळात स्थानिक असल्या तरी अभ्यासकांनी दोन वर्ग केले आहेत.

१) भटकी दंतकथा (Migratory Legend)

२) स्थानिक दंतकथा (Local Legend)

''स्थानिक दंतकथा पूर्णपणे स्थावर असते. तिच्यातील केवळ कथाबीजे विखुरलेली असतात. भटक्या कथेचे विस्तार क्षेत्र स्थानिक दंतकथेतल्या कथांबीजाहून कितीतरी विशाल असते'[७] भटक्या आख्यायिका गाजलेली कुलदैवते, ख्यातीप्राप्त संत, पुरूष, ऐतिहासिक थोर पराक्रमी व्यक्ती, जागतिक युद्ध, महत्त्वपूर्ण स्थळ ह्यांच्याशी निगडीत असतात. ह्यांचे क्षेत्र विस्तृत स्वरूपात विखुरलेले असले तरी त्यामानाने स्थानिक दंतकथांच्या विषयांची संख्या विपुल आहे. पारंपरिक लोकजीवनाचा शब्दबद्ध मौखिक आविष्कार आख्यायिकांतून जोपासला जातो. माणकेश्वर येथील लोकांची विचारसरणी, त्यांची मानसिकता, लोक दैवताची पूजा रूढी, परंपरा, समजुती चित्रण तसेच परिसरातील ग्रामदैवतांचे अवलोकन आख्यायिकात

होते. त्यामुळे आख्यायिकातून परिसरातील धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन होते. माणकेश्वर येथील समाज जीवनाचे आकलन होण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा वाटतो. उपलब्ध झालेल्या आख्यायिकांच्या आशयानुसार त्यांची विभागणी खालीलप्रमाणे करता येईल.

१) माणकेश्वर परिसरातील आख्यायिका

२) स्थानिक आख्यायिका

३) पूजाविधी संदर्भातील आख्यायिका

४) ऐतिहासिक आख्यायिका

५) देवदेवताविषयक आख्यायिका

६) भगतांच्या गद्यपद्य मिश्रित आख्यायिका

७) नवसपूर्तीच्या आख्यायिका

८) लिपीबद्ध कथा, आख्यायिका

ही विभागणी केवळ अभ्यासाच्या सोयीसाठी केली असून आख्यायिकेतून भूतकालीन तसेच वर्तमानकालीन घटनांच्या जोडीने समाज जीवनाच्या खाणाखुणा दृष्टीस पडतात.

## ३.३.१ माणकेश्वर परिसरातील आख्यायिका :

माणकेश्वर येथील महेबूब सुबानी दर्गा तसेच परिसरातील ग्रामदैवताविषयी त्रोटक स्वरूपात आख्यायिका आढळतात. खर्ड्याची लढाई, रामलिंग क्षेत्र, तुळजाई शक्तीपीठ कसे स्थापन झाले? गोमुख तीर्थाबाबतही आख्यायिका ऐकायला मिळतात. तुळजापूरजवळील चिवरी देवस्थान, तेरचे सतीचे मंदिर तसेच माणकेश्वर परिसरातील लोकदैवताविषयी ही आख्यायिका आढळून येतात.

माणकेश्वर जवळील देवंग्रा गावच्या प्रवेशानजीक असणाऱ्या 'म्हसोबा' ग्रामदैवताविषयी रोहिदास हेळकर यांनी सांगितलेली आख्यायिका अशी - 'कधी काळी

बैलाच्या पायातील रुतलेल्या खड्याला देवपण आलं आणि ह्या ठिकाणी गळून पडलेला खडा म्हसोबा म्हणून पूजला जाऊ लागला देवाला कापलेलं बकरं, कोंबड तसेच प्रसाद भक्तांनी आपल्यासोबत घरी घेऊन जायचा नाही; तर इथून जाताना प्रसाद, मटण खाल्ले तरी पाण्याने गुळना (चूळ) करूनच जावं अशी प्रथा आहे. बळी दिलेल्या बोकडाचे कातडे सुद्धा घेत नाहीत. ते घेऊन गेल्यावर अनिष्ठ परिणाम होतो. बैल बरा होऊ दे यासाठी म्हसोबाला लोक नवस करतात'[८] येथे म्हसोबाचे मंदिर असून परिसरात मोठी चिंचेची झाडे आहेत. शेंदूर लावून आज म्हसोबाची प्रतिमा शंखू आकाराची कंबरेएवढी उंची झाली आहे. चिंचेच्या झाडावर टाकलेली असंख्य बोकडाची कातडी ह्या परंपरा आणि भीतीचं निदर्शक असलेली दिसतात.

लोणी, ता. परांडा येथेही जुने म्हसोबा मंदिर असून जागृत देवस्थान असा लौकिक आहे मंदिरात तसेच मंदिर परिसरात म्हसोबाच्या असंख्य रंगीबेरंगी मूर्ती आढळतात. नवसाला यश मिळाल्यानंतर भक्त ह्या मूर्ती मंदिरात प्रतिष्ठापना करून जुनी मूर्ती मंदिराच्या बाहेर ठेवली जाते. देवाला नारळ गोड नैवद्य दाखवून घोडा आणि लाल झेंडे अर्पण करण्याची प्रथा आहे. येथेही म्हसोबाला बळी देण्याची प्रथा आहे. प्रत्येक गावच्या ग्रामदैवता पाठीमागे काहीतरी आख्यायिका असतात.

महाराष्ट्रातील आनंद संप्रदायाच्या एका शाखेत दत्तात्रेयांचे नाव 'शहदत्त आलमप्रभू' असे आहे. या संप्रदायाचा मठ भूमच्या पूर्वेकडे एक किलोमीटर अंतरावर निसर्गरम्य टेकडीवर आहे. अलमप्रभूंचे समाधिस्थान जागृत असून त्यांच्या चमत्कारांच्या अनेक आख्यायिका सांगणारे पुस्तक 'अलमप्रभू महिमा ग्रंथ' या नावाने नरसू बाबुराव माळी यांनी लिहिले आहे.

परांड्याच्या पूर्वेस असणाऱ्या काळभैरवनाथ मंदिराचा उल्लेख स्कंदपुराणात आढळतो. 'चंड' नावाच्या दैत्याचा मुलगा 'प्रचंड' हा गोदावरीच्या दक्षिण भागात दंडकारण्यात प्रचंड नगरीत (हल्ली परांडा) राहत होता. त्याच्या त्रासाने सर्व पीडित शंकराला शरण गेले.

शंकराने आपल्या नेत्रातून काशी क्षेत्राच्या रक्षणासाठी जे आठ भैरव निर्माण केले. त्यापैकी कालभैरव याने या प्रचंड दैत्याचा, तसेच सुवर्णासुर, भौमकासुर ह्यांचा नाश केला त्यानंतर शंकराने त्यांना सोनारीत राहण्याची आज्ञा केली. त्यामुळे कालभैरव सोनारीत वास्तव्य करून लागले.'' अशी आख्यायिका रावसाहेब गटकळ यांनी सांगितली.[९] भैरवनाथाची यात्रा चैत्र अष्टमीला भरते. मंदिर परिसरात असंख्य माकडे असून देवाची असल्याची मानले जाते. सुवर्णासुर दैत्याच्या उन्मादाचे निर्दालन केले म्हणून सोनारी, भूमडोंगरात भौमकासुराच्या वधामुळे भूम अशी नावे नगरास कालांतराने पडली असावीत. परांडा हे प्राचीन काळी पलियण्ड किंवा प्रत्यंडक 'पुराण साहित्यात त्याचा उल्लेख परमधामपूर नावाने तर परमानंद कवीच्या श्री शिव भारतात त्याचा निर्देश प्रचंडपूर म्हणून केल्याचे आढळते.'[१०] वरील आख्यायिकेतील ऐतिहासिक सत्य घटनेनुसार प्रचंडपूरमध्ये निवास करणाऱ्या प्रचंड दैत्यामुळे नगरीचे नामकरण परांडा असेही झाले असावे.

सोलापूर-औरंगाबाद रस्त्यानजीक दोन किलोमीटर अंतरावर उंच निसर्गरम्य टेकडीवर येडेश्वरी देवस्थान आहे. 'येडाई - येडेश्वरी, येडाबाई' असे नाव का पडले? याविषयी दत्ता बेडके यांनी सांगितलेली आख्यायिका अशी - प्रभू रामचंद्र दण्डकारण्यातून सीता शोधण्यासाठी जात असताना देवी पार्वतीने सीतेचे रूप घेवून भुलवण्याचा प्रयत्न केला तेंव्हा रामाने पार्वतीला 'येडी आहेस' असे म्हटले तेव्हापासून बघा ही देवी हिथं राहिली आणि येडाई, येडेश्वरी नावाने पावन झाली'[११] येथे चैत्र शुद्ध पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. यात्रा कालावधीत आंब्यांच्या एका झाडाला चक्क कवड्या लागतात. याविषयीही आख्यायिका आढळून येतात.

'पूर्वी बालघाट डोंगर-दऱ्यात महिषासूर दैत्य व त्याची सेना मानली होती. हे दैत्य ऋषीमुनींच्या होम हवनाच्या विधीमध्ये विघ्न आणायची महिषासुराचा उपद्रव थांबविण्यासाठी ऋषिनी शंकराची अखंड उपासना सुरू केली. शंकराने प्रसन्न होऊन पार्वतीला सांगितले - 'तू भवानीचं रूप घेऊन तुळजापूरला जा' तुळजाभवानीच्या रूपात पार्वतीने नऊ दिवस आसुरांशी

युद्ध करून नवव्या दिवशी महिषासुराला ठार केले आजही भवानी देवी वेगवेगळ्या आयुधांसह हातात दैत्याचे शिर आन् त्रिशूल घेऊन उभी असून तिला महिषासूरमर्दिना म्हटले जाते. नवव्या दिवशी विजय मिळाल्यामुळे नवरात्र उत्सव साजरा केला जातो. मूर्ती गंड शिला या दगडापासून बनविलेली असून चल स्वरूपाची आहे'[१२] अशी आख्यायिका अमर देशमुख यांनी सांगितली. तेर येथील श्रीनृसिंह मंदिराविषयीची प्रदिप इंगळे यांनी सांगितलेली आख्यायिका अशी - 'एकदा शंकर पार्वती यांच्यात भांडण झाल्याने रागारागाने दोघेही दूर निघून गेले. राग ओसरल्यानंतर पार्वतीला पश्चाताप झाला आणि तिने शंकरांची आराधना केली. तेव्हा श्रीनृसिंहानी पार्वती आणि शंकराची भेट येथे घडवली.'[१३] मंदिराच्या आवारातील शिवलिंग म्हणजे या घडलेल्या घटनेचे स्मारक (स्मरण) समजले जाते.

### ३.३.२ स्थानिक आख्यायिका :

स्थानिक आख्यायिका मंदिर ठिकाण, स्थळ, व्यक्ती, वस्तू, प्राणी, ग्रामदैवत अशा अनेक विषयाशी निगडीत असतात. माणकेश्वराच्या शिव-सटवाई विषयी, मंदिर, भुयार दातकोरणीचे झाड, समाधी, देवळालीचे आबा शंख, गाय, नागोबा, पुरलेलं धन, बळी प्रथा, विश्वरूपा नदीविषयी चालत आलेली माहिती मौखिक स्वरूपात अनेक आख्यायिकामधून बंदिस्त झालेली दिसून येते. स्थानबद्धता हा या आख्यायिकांचा विशेष आढळतो.

'देवीला सटवाई हे नाव का पडले?' याविषयी अनुसया गुरव यांनी सांगितलेली आख्यायिका अशी -

''पूर्वी येथे दाट अरण्य, झाडी झुडपं होती. इकडे कुणी फिरकत नव्हते. रावणाने सीता पळविल्यानंतर राम-सीतेला हुडकत हुडकत रामलिंग, येरमाळा, माणकेश्वर मार्गे करमाळ्यास निघाले होते. माणकेश्वर येथे कथा अशी घडली, सटवाई श्रीरामाची चेष्टा करण्यासाठी सीतेच्या रूपात श्रीरामा समोर उभा राहिली. 'सटवाई फसवती का मला?' असं म्हणून रामाने सटवाईला ओळखले. खऱ्या रूपात सटवाई प्रकट होऊन श्रीरामास लंकेचा मार्ग दाखविला'[१४] तेंव्हापासून

देवीस सटवाई देवी असे नामकरण प्राप्त झाल्याचे लोक सांगतात. यापेक्षा वेगळी आख्यायिका राजश्री हांडे यांनी सांगितली - 'शिव व पार्वती हे आवतारी पुरूष मानले आहेत म्हणून ते क्षणात कैलासावर तर क्षणात खाली जमिनीवर उतरू शकतात. एकदा दोघेही माणकेश्वर येथे उतरली असता. त्यांची तेथे चर्चा सुरू झाली आता चर्चा नेमकी कोणती झाली हे आपल्याला सांगता यायची नाही. परंतु लोक म्हणतात, 'एक असं विचित्र .... विचित्र .... वाक्य पार्वती बोलली आणि विचित्र वाक्य बोलल्यानंतर शंकराला ते पटलं नाही. तेव्हा शंकर म्हटले 'काय तरी सटवाई बोलतीस' तेव्हापासून तिला सटवाई म्हणून ओळखले जाते.'[१५] ह्यांच्या मतानुसार सटवाई पार्वतीचाच आवतार असून येथे तिला सटवाई असे नाव तिच्या विचित्र वागण्यामुळे मिळाले असावे. परंतु अश्रु बन्सी तेलंग ह्या मातंग समाजातील भगताने सांगितलेली आख्यायिका अशी - 'सटवाई आणि शिव एकाच मंदिरात व्हती. परंतु सटवाईला बकरूं लागतं म्हणून तिला बाजूला ठेवण्यात आलं. सटवाई ही मातंग ऋषिची मुलगी असून महादेव मातंग समाजाचा जावई आहे. बकरं पडत असूनसुद्धा दोघजण इथं जवळ हायती. मग ती कोण हायती? सटवाई आणि महादेव ही नवरा बायकोच आहेत'[१६] असे भावपूर्ण उद्‌गार त्यांनी काढले. 'भारतीय परंपरेत माता, मातृका, योगिनी, जातहारिणी इत्यादी अनेकानेक नावांनी मातृदेवताच्या नामावली आणि कथा, कहाण्या ऐकायला मिळतात. या नामावलींच्या आणि नामांचे रहस्य स्पष्ट करणाऱ्या कथा, कहाण्यांच्या परिचयातूनच आपल्याला मातृदेवतांच्या उपलब्ध मूर्तीचे अंतरंग समजू शकेल. त्याचे चरित्र चारित्र्य उमगेल त्यांच्या उपासनेचे स्वरूप आकळेल आणि यात सर्वांतून उमटणारे लोकमानस न्याहाळता येईल'[१७] परिसर आख्यायिका पहाताना लोकस्मृतींच्या आकलनानुसार रामाचे सीता शोध प्रित्यर्थ तुळजाई, येडेश्वरी, कमलाई या देवताचं झालेले नामकरण याचा आढावा घेतल्यास सटवाई असेच संबोधले गेले असावे.

देवीला निवद गोडव्याचा, मग बळी कुणासाठी? याविषयी मंदिराचे सेवक सुरेश जगदाळे यांनी सांगितलेली महिषासूर दैत्याची आख्यायिका अशी - 'देवीनं दैत्याला मारलं त्यावेळेस देवीला द्या आली, मग त्याला देवी म्हणाली, बाबा शेवटच मागण काय असेल तर

माग, तेव्हा दैत्यानं मागणी घातली की, 'माझा जो मांसाहार आहे तो शेवटपर्यंत पुरव' म्हणून देवीनं दैत्याला वचन दिलं. त्यावेळेपासून दैत्याला बकरं देणं चालू आहे. देवीच्या पायाखाली दैत्याची मूर्ती आहे.'[१८]

देवी राक्षसांवरदेखील कृपादृष्टी करते आणि आपल्या आसूर शक्ती, आपल्या आसूरी इच्छा पुढेही बळावत रहाव्यात म्हणून असे मागणे मागणाऱ्या अनेक लोककथा भारतभर प्रचलित आहेत.

माणकेश्वर येथील शिवमंदिर प्राचीन स्थापत्य शिल्पाची साक्ष देत उभे आहे. मंदिर बांधकामाच्या संदर्भातील अनेक ग्रामस्थांच्या तोंडून मिळालेली आख्यायिका अशी - 'हे शिवमंदिर राकीसांनी (राक्षस, आसूरशक्ती) एका रात्रीत बांधले व नंतर उजडायच्या आत ते अदृश्य झाले.' या आख्यायिकेत सत्याचा लवलेशही जाणवत नाही. मंदिराचा आकार, बांधकामाची विशिष्ट पद्धत व त्यावर केलेले अपूर्व कोरीव काम लक्षात घेता हा अद्‍भुत चमत्कार एका अंधाऱ्या रात्री घडणे केवळ अशक्यच आहे. देवळाली ते माणकेश्वरच्या शिवमंदिरा दरम्यान एक भुयार आहे. देवळालीचे आबा शंख यौवन काळात भुयारातून महादेव मंदिरात दिवा लावायला येत असतं अशी भुयाराविषयीची आख्यायिका लोकांकडून ऐकावयास मिळते. परंतु माणकेश्वर ते देवळाली तीन किलोमीटरचे अंतर आहे. अशा भूगर्भातील मानव निर्मित रचनेचा आज कुठेही धागा सापडत नाही. गिरी संप्रदायाचे लोक येथे पूर्वी रहात असावेत. ते शिवभक्ती करत. आजही येथे जमगिरी बाबांची जिवंत समाधी आहे. आज त्या समाधीमध्ये धन पुरल्याचे सांगितले जाते. गावातील कोण एक ते उकरायला गेला असता जसा खोल खोल जाईल तसं त्याला माणिक मोती दिसले आणि तो मरून गेला.' अशी माहिती गावकरी सांगतात. तसेच 'मंदिरापासून जवळच एक दातकोरणीचे झाड आहे. या झाडाला लागणाऱ्या फळांच्या बियांना महादेवाच्या पिंडीचा आकार निसर्गत:च प्राप्त झालेला असून ह्या झाडाचा पाला अनेक रोगावर आयुर्वेदिक दृष्ट्या गुणकारी समजला जातो. या स्वरूपाची माहिती माणकेश्वर येथील किसन अंधारे यांच्या तोंडून नकळत बाहेर पडली'[१९]

स्वत: मी त्या झाडाचा पाला खाल्ला. गोड वाळूक खावं अशी त्याची चव असून माझ्या शेजारची मुलं मुठमुठ भर पाला खाताना दिसली. मुक्ताबाई सोमनाथ घोडके यांनी सांगितलेली नागोबा विषयीची आख्यायिका अशी - 'सटवाईचा भक्त म्हणाला, की हे बघ नागुबा कुठच पाणी लागलं नाही. तुझ्या म्होरं सटवाई अन् महादेव हाय तू त्याच्या पाठीमागं म्हणजे पाठीशी हाय. मी तुझी परवरी वर घेतो. कट्ट बांधतो. पाणी लागू दे. अन् खरंच भरपूर पाणी लागलं. गावात पाणी नाही पण नागोबाने येथे पाणी दिलं आहे. आज येथे टाकी बांधली असून साऱ्या यात्राला पाणी पुरतं हे पाणी भावानं बहिणीला दिलं आहे'[२०] श्रद्धाशील भावनेनं सांगितलेली वरील आख्यायिका आजच्या वैज्ञानिक युगात शंकास्पद वाटते परंतु 'कावळा बसायला आणि फांदी तुटायला' गाठ पडावी तशी हकीगत घडल्याचे दिसून येते. नाग प्रसन्न झाल्यावर मानवाचे कल्याण करतो. नागाच्या कृपेने अपत्यप्राप्ती होते. नाग भूमिगत द्रव्याचे रक्षण करतात असे अनेक कल्पनाबंध जगभरातील लोककथातून पहावयास मिळतात.

प्राण्यांच्या माध्यमातून आख्यायिकांमध्ये नीतितत्त्व किंवा बोध सांगण्याचा प्रयत्न केला जातो. काशीबाई आबासो हांडे यांनी 'काळी कपिला गाय' विषयीची सांगितलेली आख्यायिका अशी -

'इथं काळी कपिला नावाची गाय फिरायला यायची. एक गरिबाचा मुलगा होता. दररोज राखायला यायचा. तो तिला म्हणायचा की, 'मी तुला रोज राखतो, तू कुठं जातीस? आणि सकाळीच माझ्याकडे कशी येतीस? एके दिवशी त्यानं विचार केला. दिवसभर गाईच्या शेवटीला धरून राहतो; आणि ही कुठं जातीय ते बघतो अशी ती भोयऱ्यात उतरली. शेपटीला धरून खाली गेल्यानंतर वास यायला लागला. अशी साखळी गळ्यात येऊन पडायची. इबिताचे खडे यायला लागले; तरीपण तो गाईला सांभाळीत होता का काय म्हणून गाय त्याला काय करत नव्हती. नंतर मग तो म्हटला, 'बाळ तू कोठला', तो म्हणाला, 'मी रोज हितं गाय राखतो ही दररोज कुठं जाती आणि सकाळी माझ्याकडं कशी येती' असे म्हणायचा म्हणून तो

म्हणाला, 'बाळ तुला काय पाहिजे?' मला काय नको. मला एवढच बघायचंय की गाय कुठे जातेय. तर मी गाय संगे सकाळ जाणार हाय. तो माणूस त्याला म्हणाला, 'नको तू आताच जा बाळ' तर त्या गोसाव्यान त्याला बाहेर पाठवला. तर त्या मुलाचे कितीतरी चांगले झाले.

परत मग गाय आतमध्ये राहिली. इकडं कैकाडी फोक तोडायला आल्यावर त्यानं त्या गायीवर जीव लावला. त्यानं ती घरी आणली. खाणं, पिण, चारणं मग ती गाय प्रसन्न झाली. प्रसन्न झाल्यावर ती गाय बोलली का काय? मग कैकाड्यानं महादेवाचं मंदिर बांधलं आन् त्यात त्याला सापडलेली पिंड ठेवली. ते मंदिर शिव मंदिराच्या पलीकडं हाय. लय दिवस कैकाड्यानं ती गाय सांभाळली. मग ती गाय मेली का काय झाली? तिच्या वसवंडीच्या पाठीवर जिभ होती. आम्ही ती स्वत: बघीतली व्हती'[२१]

गोसाव्याचं ऐकणारा मुलगा, गाईला जीव लावणारा कैकाडी ह्यांच्या कृतीनुसार दुसऱ्यांनी आचरण केल्यास तुम्हीसुद्धा सुखी, संपन्न आनंदी जीवन जगू शकता असा बोध केला जातो अशा आख्यायिका कल्पित स्वरूपाच्या असून आकाराने लहान असतात. कपिला गाईचा गरीब गाय असा स्वभावधर्म दृष्टिस पडतो. 'पंचतंत्र', 'हितोपदेशे', 'इसापकथा' या ग्रंथात विपुल प्राणीकथा आढळतात. कित्येक शतकापासून अशा प्राण्याविषयीच्या कथा लोकजीवनात रूजलेल्या आहेत.

वरील आख्यायिकातून लोकांची साधक बाधक विचार करून वागण्याची, बोलण्याची पद्धती कशी आहे हे दृष्टीस येते. गावातील एखाद्या घटनेची सांगड पुरातन परंपराशी जोडताना लोकांच्या कल्पनाशक्तीचा आणि प्रतिभाशक्तीचा अभ्यास करणे हा एक रंजक विषय आहे.

### ३.३.३ पूजाविधी संदर्भातील आख्यायिका :

इष्ट देतांची पूजा केल्याने देवता प्रसन्न होतात व कार्यसिद्धी होते अशी श्रद्धा हजारो वर्षापासून भारतीय संस्कृतीत दृढमूल झालेले दिसून येते. माणकेश्वरच्या 'शिव-सटवाई'

देवतांच्या पूजा, उपासना, त्यामध्ये आडथळा आणणाऱ्यांचा बंदोबस्त, धर्मविधी, व्रते, नवस, विधिलिखित अशा स्वरूपातून धर्मचरणाशी नाते जोडणाऱ्या अनेक आख्यायिका मिळाल्या. प्रामुख्याने जागृत देवस्थानाविषयी अशा आख्यायिका प्रचलित असल्याचे आढळून येते.

समाजातील धार्मिक पूजाविधीत तसेच मानवाच्या मनात या आख्यायिकासंबंधी श्रद्धा भावाची निर्मिती झालेली दिसून येते. शक्ती उपासना दु:ख दूर करून नवजीवन देणारी, सुखावणारी म्हणून प्रेरणादायी ठरते. अनेक देवतांनी आपल्या भक्तांना काही निर्बंध घालून दिलेले असतात. ते निर्बंध पाळावेच लागतात. अन्यथा संबंधित देवतेचा कोप होतो. माणकेश्वरच्या 'शिव' पूजा, भक्ती विषयीची देवळालीचे आबा शंख ह्या शीर्षकाची कथा लक्षात घेण्यासारखी आहे. या आख्यायिकांची दोन भिन्न रूपे मला मिळाली असून ती ध्वनिमुद्रित केली आहेत. या आख्यायिकांना कल्पनाविष्काराची जोड लाभली असली तरी आशयसूत्र एकच असलेले दिसून येते. या संदर्भातील पहिली वसंत धोंडिबा शिंदे यांनी सांगितलेली आख्यायिका अशी -

'देवळालीचे आबा शंख ब्राह्मण होते. ह्या महादेवाची पूजा केल्याशिवाय जेवत नव्हते. ह्या महादेवाची चांगली प्रसिद्धी होती. त्याला इथे परिस सापडला. देव त्याला प्रसन्न झाला. तो परिस कशालाही लावला की त्याचे सोने व्हायचे त्यानंतर त्याने दानधर्म सुरू केला. ठराविक वेळेत बाबा अकरा वाजेपर्यंत दान करायचा अन् पुन्हा जेवण करायचा. आबा वारल्यानंतर भूमला शाळूजी होते. ते बी ह्यांच्या पेक्षा खूप श्रीमंती झाले. ते मादूकरी मागायला इथे यायचे. त्यांन यायच्या त्या टायमाला यांचा वेळ संपलेला असायचा. भिक्षा द्यायचा वेळ संपला की त्यानं परत जायचं मग त्यान काशीला जाऊन बारा वर्षे तपश्चर्या केली. तर तेथे शंकर प्रसन्न झाला. आबा शंखाचे ऐश्वर्य तेथे गेले. देवळालीच्या आबा शंखाची जेव्हा धन दौलत चालली होती; तेव्हा जेवायला बसलेले ताट धरलं तर तुकडा हातात, असं सांगतात व भूमला जेवायला गेला तर नेमकं फुटकं ताट त्याच्या समोर आलं. फुटक्या ताटाचा तुकडा जोडला तर ती बी

गेला. भांडी धुताना चौकशी सुरू झाली. फुटकं ताट नाही ऽऽऽ फुटकं ताट नाही ऽऽ तर तो मनुशी मादुकरी मागणारा, आबा शंखाची झडती घेतली. तर तो म्हणाला माझ्या जवळचाच तुकडा होता तो ताटाला चिकटला होता. अशी तिथली आख्यायिका आहे.'[२२]

या देवळालीला आजसुद्धा 'आबा शंखाची देवळाली' म्हणून ओळखले जाते दान धर्माचे महत्त्व पूर्वीपासून ग्रंथात, लोककथात तसेच प्रवचनामधून सांगितले जाते. वरील आशय सूत्राशी समकक्ष अशी आण्णासाहेब अंधारे यांनी सांगितलेली दुसऱ्या आख्यायिकाची संहिता अशी -

'येथूनच जवळ देवळालीत महादेवाचे मंदिर आहे. भद्रावती पूर्वीचं नाव - त्याच्याजवळ ५०० सोन्याची ताट होती - माणकेश्वरच्या महादेवाची सेवा, पूजा - सेवेनंतर अहंकार वाढला - लक्ष्मी उदास झाली. अन्नाबद्दल अहंकार आबा शंखाच्या मनात निर्माण झाला. हवेमध्ये ताटे उडून भूमच्या खोल्याच्या घरी गेली. तो ही शिवभक्त होता. आबाच्या हातात एक ताटाचा तुकडा फक्त राहिला. त्याचं ही वैभव दोन वर्षात संपुष्टात आलं. बीडच्या धोंड्याच्यात नंतर ताटं गेली. दररोज तेथे ५०० लोक जेवत. तेही बंदिस्त खोलीत, बाकीच्या लोकांना वाट पाहत बसावे लागे. आबा शंख तेथे भीक मागायला आला. आबाच्या पुढे तुटके ताट आले. संपत्तीचा अहंकार बीडच्या धांडेच्यात आला. जेवल्यानंतर स्वत:च ताट स्वत: धुयाचं (इसळायचं) अशी प्रथा होती. आबा ताट धुताना हातातील तुकडाही त्या ताटाला चिकटला ताटे जमा झाल्यावर धोंडीबांना शंका आली. 'तुटक ताट नाही?' आबा शंख सांगतात, 'माझ्याकडचा तुकडा तो कसा लक्ष्मीने घेतला' अशी आख्यायिका आहे'[२३]

'गरिबी आली तर लाजू नये अन् श्रीमंती आली तर माजू नये' या लोकोक्तीनुसार शिवभक्ती, पूजा, सेवेतील अहंकार वाढल्यामुळे दोन्ही आख्यायिकातही आबा शंख भिक्षा मागताना वणवण भटकत असलेला दिसून येतो. लक्ष्मी प्राप्त होणे आणि वैभव धुळीला मिळणे या गोष्टी आपल्या हातात नसल्याचा बोध वरील आख्यायिकांतून होतो. या

आख्यायिकांचा संदर्भ कथागीतातून येताना आढळतो. तेथे त्याला पद्याचे स्वरूप प्राप्त होते. यादवकाळात तसेच अर्वाचीन काळातही येथे अनेक शिवभक्त शिवपूजेत रममाण असल्याचे दिसून येते. साखळीच्या स्वरूपामध्ये ह्या आख्यायिका एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी (देवळाली - भूम - बीड) प्रवास करताना दिसतात.

नानासाहेब जोशी यांनी माणकेश्वराच्या जागृत शिव देवस्थानविषयी सांगितलेली आख्यायिका अशी-

'एकदा माणकेश्वरला एका धनिका घरी दरोडा पडणार होता. दरोडेखोर रात्रीच्या वेळी विश्वेश्वर मंदिरात जमा झाले. या मंदिरापासून माणकेश्वर अर्धा मैल दूर आहे. रात्रीच्या समयी सहसा तिकडे कोणी फिरकत नाही. योग्य वेळ होताच सर्व दरोडेखोर गावच्या दिशेने चालू लागले. इकडे धनिक सावकार शंकराची आराधना करून केव्हाच निद्रेच्या स्वाधीन झाला होता. तो विश्वेश्वराचा परमभक्त होता. जसजसे दरोडेखोर वेशीजवळ येऊ लागले तस तशी त्यांची दृष्टी कमी होऊ लागली. थोड्या कालावधीतच ते आंधळे बनले. हा चमत्कार पाहून ते परत फिरले आणि विश्वेश्वराला शरण गेले. अशा तऱ्हेने त्या सावकाराचे संकट दूर झाले. विश्वेश्वर मंदिरात जर कुणी अनुष्ठानास बसले, तर अजूनही रात्री बाराच्या पुढे गाभाऱ्यातून ॐकार ऐकू येतात'[२४]

शिव आराधना करणाऱ्या परमभक्ताची संकटापासून सोडवणूक होते असा संदेश वरील आख्यायिकेत आढळतो संजीवनी हिंगे यांनी शंकराने पारध्याला शिवलोकात स्थान दिल्याची सांगितलेली आख्यायिका या संदर्भात लक्षात घेता येईल. ती अशी -

'आटपाट नगरीतील एक पारधी शिकारीसाठी अरण्यातून भटकत होता. दिवसभर फिरून त्याला तहान लागली. पाण्याच्या शोधात तो तळ्याकडे गेला. पोटभर पाणी पिऊन तळ्याकाठच्या बेलाच्या झाडावर बसून शिकारीचा शोध घेण्यासाठी वर चढला. पण त्याला शिकार काही मिळत नव्हती. त्या दिवशी पारध्याला दिवसभर अन्नावाचून उपवास घडला.

विचारक्रांत अवस्थेत तो झाडांची एक एक पाने तोडून खाली टाकू लागला. बेलाच्या झाडाखाली धोतऱ्याच्या झुडपात अदृश्य अशी सांबाची पिंड होती. तिच्यावर धोतऱ्याची फुले अगोदरच गळून पडली होती. ते त्याला माहित नव्हते. अजाणतेपणाने त्याच्या हातून शिवपूजा झाली. तळ्याकाठी सकाळी एक हरिणी पाण्याच्या शोधात आली. पारधी धनुष्यबाण मारणार इतक्यात हरिणी मनुष्यवाणीने बोलू लागली. ती विनवणी करीत म्हणाली, 'माझ्या पिलाला, मी दूध पाजून येते. त्याची अखेरची भेट घेते. मग तू मला अवश्य मार' थोड्याच वेळात हरिणी दिलेल्या वचनाप्रमाणे आली परंतु शिवपूजनाने पारध्याचे मन परिवर्तन झाले. हरिणीला त्याने जाऊ दिले. ती हरिणी म्हणजे प्रत्यक्ष शंकरच होते. पारध्याची परीक्षा पाहण्यासाठी त्यांनी हरिणीचा अवतार धारण केला होता. भविष्यात पारध्याने शिकार करावयाचे सोडून शिवसेवेत रममाण झाला. शिवाने पुढे त्याला शिवलोक दिला'[२५] अजाणतेपणाने केलेली सेवा देखील परमेश्वर प्रत रूजू होते. पारध्याच्या आख्यायिकेप्रमाणे आणखीही काही आख्यायिका प्रदेशपरत्वे निरनिराळ्या आढळून येतात. आख्यायिकांतील प्राणी मनुष्यप्रमाणे संवाद साधतात. हा संवाद श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेतो. शिवपूजा, आराधना मनशुद्धीसाठी आवश्यक असल्याचा बोध वरील आख्यायिकेतून घडतो.

षष्ठिपूजेसंदर्भात प्रकरण दोन मध्ये विस्तृत आढावा घेतला आहे. प्रामुख्याने येथे सटवाई पूजाविधीशी निगडीत आख्यायिकांचा विचार करावयाचा आहे. 'स्त्रिया बाळबाळंतिणीला सुख लाभावे म्हणून पाचवी आणि सहावीच्या रात्री कथा सांगतात'[२६] 'सटवीची अक्षरे' ही भटकी आख्यायिका असली तरी स्थानिक बोलीभाषेत ती रूजलेली असून नशीब आणि दैवावर भर देणारी आहे. ललाटरेषा वरील ब्रह्मासटवाईचे लिखान, सटवीने मुलाच्या जन्मानंतर सहाव्या दिवशी कपाळावर लिहिलेला लेख असा त्याचा अर्थ आहे. याविषयीची 'सटवी-ब्रह्माची कहाणी' किंवा 'सटवाईची कथा', 'सटवीची कथा' अशा विविध शीर्षकातून ती लोकमानसात रूढ झालेली दिसून येते. मला सटवाईच्या विधिलिखिता विषयी

तीन आख्यायिका मिळाल्या असून वेगवेगळ्या विषयाशी त्या संबंधीत आहेत. सटवाईच्या सर्वच आख्यायिकांमध्ये 'विधिलिखित हे सत्यच ठरते' हाच आख्यायिकांचा केंद्रबिंदू असल्याचे आढळते. जनाबाई इतापे यांनी सांगितलेली 'सटवीचा लेखा, नाही पडला चुका' ही आख्यायिका लक्षात घेण्यासारखी आहे. तिची संहिता अशी -

'सटवाई आपल्या आईला म्हणते, 'तू रात्री १२ वाजता कुठे जाते. मला भीती वाटते' साऱ्या महाराष्ट्राचं नशीब सांगते, तर माझं सांग काही केल्या तिची आई सांगतच नव्हती; पण मुलीच्या हट्टापुढं ती म्हणाली मग ऐक तर, 'तू वारकाची बाई होशिल, तुझ्यावर आळ येईल, जन्मलेला पोरगाच नवरा होईल' हे ऐकूण पोरगी हे सारं टळावं म्हणून तरूण वयात घर सोडून दूर दूर वनात जाते. एकदा राजाचा मुलगा वनात आला आणि नकळत तिच्या त्याच्याशी संबंध आला. स्वत: ती सटवाईची मुलगी होती. मूल नदीत टाकून देते परंतु त्याला टाकून देताना आपल्याच साडीचं बाळूत घेऊन त्यात त्याला घट्ट बांधते. वाहात वाहात पोरंग एका मासेवाल्याला सापडते. त्यांनाही मुलबाळ नव्हतं, पोरगा रोज शिकारीला जायचा. एकदा त्याला ही देखणी बाई वनात एका झोपडीत दिसली तो तिला पाणी मागतो. घरी कोण नाही म्हणून ती त्याला जायला सांगते. अखेर त्याची दया येऊन ती त्याला पाणी देते. मुलगा घरी आल्यानंतर आई-बापाला केली तर तिच बायको करायची म्हणतो. लग्न ठरलं.लग्न लावलं.देवधर्म केलं.संध्याकाळी घरामध्ये पालगावर दोघं झोपली असता तिचं लक्ष खांडावर ठेवलेल्या बाळूत्याकडे जाते. माझीच साडी आहे असं म्हणून ती लाटकन उठते. मुलाला म्हणती थांबा, आई-वडीलांना ती विचारते, 'हे मुल तुमचं का दत्तक घेतलं?' आई वडील सर्व हकीगत सांगतात. 'बाळ तू माझ्या पोटचा आहेस' म्हणून ती रडायला लागली. 'सटवीचा लेखा नाही पडला चूका' तेव्हापासून सटवाई डोंगरात राहिली. आणि माय लेकरं पुन्हा एकत्र राहू लागली'[२८]

प्रत्येकाच्या कपाळावर जीवनात पुढे कोण, कोणती घटना घडणार याची हकीगत

UNIVERSITY ... KHAPUR

सटवाई लिहित असते, असा समज आहे. 'होणारे न चुकेल, होईल जरी ब्रह्मा तया आडवा' या गोष्टीचा परिचय खुद्द सटवाईच्या मुलीला कसा आला याबाबतची ही मनोरंजक कथा आहे. इडिपलावस्थेत (Oedipal Stage) मुलग्यास आईचे अधिक आकर्षण वाटते आणि आपल्या वडिलांविषयी मत्सराची (Jealousy) भावना निर्माण होते. यालाच फ्रॉईडने इडिपस कॉम्प्लेक्स (Oedipus Complex) ही संज्ञा वापरली आहे. 'मुलग्याचे त्याच्या आईविषयीचे आकर्षण हे लैंगिक भावनेतून निर्माण झालेले असते असे त्याचे मत होते'[२९] परंतु वडिलांनविषयीचा मत्सरभाव येथे दिसत नाही. त्यांची भूमिका एखाद्या खलनायकासारखी गर्भधारणेच्या प्रक्रियेशी निगडीत असलेली दिसते. महाराष्ट्रामध्ये आढळणारी 'सटवाईची कथा' आणि ग्रीक संस्कृतीशी निगडीत असणारे जगप्रसिद्ध नाटक 'राजा इडिपस' मधील कल्पनाबंध सारखा असलेला आढळतो.

'ब्रह्मा - सटवीचा लिखा, पडा ना चुका' या विषयी कौशल्या बाबासाहेब शिंदे यांनी सांगितलेली आख्यायिका अशी -

'पाचव्या दिवशी नशीब लिहण्यासाठी आलेल्या ब्रह्मदेवाला एका मुलानं विचारल, तुम्ही काय करता' 'लग्नाच्या जोड्या (गाठी) लावतो आहे' 'माझी कुणाशी गाठ बांधली आहे?', पलिकडं वस्ती आहे त्यांना सात मुली आहेत. त्यांना मुलगा नाही. त्यांच्या तिसऱ्या मुलीशी गाठ मारली आहे. हट्टी मुलगा बघायला गेला. ब्रह्मदेवाचं भाकित मुलीच्या आई वडिलांना सांगतो. मुलगी दाखवा म्हणतो. मुलगी अशक्त आहे. परंतु मी मुलगी घेऊन जातो असे तो म्हणतो, थांबा तिची सटवाई करते. मुलगी गरिबाची आहे, हुंडा देणार नाहीत. मारून टाकण्याच्या इराद्यानं दरीत टाकून देतो. घरी जातो. पाचव्या दिवसानंतर जाऊन पाहतो तर मुलगी दरीत नाही, बरं झालं. एकदा शंकर पार्वतीकडे मुल मागण्यासाठी एक कुटुंब आलं. 'तुमच्या कर्मात मुल नाही', कसं देणार असं करा तुम्ही फिरत जा. तुम्हाला मुल सापडेल आणि त्याचे पालन-पोषक करा. शंकर-पार्वती विमानातून जाताना मूल रडल्याचा आवाज

येतो. पार्वती विमानातून जाताना मूल रडल्याचा आवाज येतो. पार्वती शंकराला विमान खाली घेण्याची विनंती करते. लेकराच्या तोंडाला रडून रडून फेस आला होता. मुलीला उंच घेऊन पर्वतावर देवाच्या घरी घेऊन आले. मुलींच्या तब्येत चांगली केली. इकडे तो मुलगा भटकतच होता. मुलगी मारल्याचा आरोप येईल म्हणून भटकत राहिला. 'आता मला कोणी पकडू शकत नाही.' असाच तो शंकर पार्वतीकडे गेला. मुलगा आता वयस्कर दिसू लागला, मुलगी पण वयात आली होती. मुलगी जवळ आहे. लांब कुठ जायचं लग्नाचं सामान जमा करा. दोघांचे लग्न झाले. तो मुलगा ब्रह्मदेवाकडे जातो आणि म्हणतो, 'मी नवरी चुकवली, ती मुलगी मेली' मी देवाची मुलगी केली. शंकर पार्वतीची मुलगी केली' त्यांनाच विचार ''तुम्हाला ही मुलगी झाली का हो?'' असे ब्रह्मदेव म्हणतात. मग त्याला सर्व कहाणी सांगतात. याप्रमाणे सृष्टीचा संहारकर्ता यालाच मुलबाळ नाही. कारण ब्रह्मानं व सटवाईनं सुद्धा 'तुला (शंकर व पार्वतीला) मूल बाळ न होण्याचा अन् सर्वांचा पालनकरता त्यांना ही सृष्टीची लेकरं ही तुझीच आहेत' असा लेख लिहिला होता.'[३०]

'ब्रह्मदेव लग्नाच्या गाठी मारतो'[३१] या शीर्षकातील वैद्यही कोळेकर यांची कथा लक्षात घेण्यासारखी आहे. सटवाई संबंधी लोकमानसात अनेक प्रकारच्या समजूती, रूढी आहेत. दैव पूर्वकर्मानुसार जन्मल्याबरोबर निश्चित होऊन त्यानुसार जीवनक्रम चालतो अशी श्रद्धा लोकमानसात खोलवर रूजली आहे. 'सटवाईची अक्षरे' काही केले तरी चुकत नसल्या संदर्भातील आख्यायिका सुमन थोरात यांनी सांगितली, ती अशी -

'भावानं सटवाईला नवस केला की, माझ्या बहिणीला मुल होऊ दे. पाचवी पुजायला बहिणीकडे आला सटवाई भाग्य लिहायला आली तेव्हा त्यानं विचारलं, 'काय केलं माझ्या भाच्याला?' १६ वर्षे आयुष्य आहे. १६ वर्षाच्या आत लग्न नाही केलं तर १६ व्या वर्षी जो पोळा (बेंदूर) येईल; आणि खांदा मळणी दिवशी साप चावून मरलं' बरेच दिवस गेले. मुलाचं शिक्षण झालं. भाऊ बहिणीकड आला. जेवण करून बहिणीला चंगाळ्या मागू लागला.

'उतरंडीला डेऱ्यात ठिवल्या आहेत' भावाला माहित होते. त्यानं डेऱ्यावर झाकणी झाकून ठिवली. ते गाडग घेऊन वेशीवर आला. गाडग फोडून सर्पाचे तुकडे तुकडे केले. भाचा आईला म्हणाला, 'मामा वेशीवर का असा ओरडतोय?' म्हणून बघायला गेला. तुकडा केलेल्या सर्पाची इतभर फणी, बघायला आलेल्या भाच्याला चावली.'[३२]

सटवाईला एखाद्या भक्ताने हट्टपूर्वक अडवून विधिलिखित विचारले तर ती सांगताना आढळते. विधिलिखित असत्य ठरावे आणि संकटातून मुक्ती मिळावी यासाठी आख्यायिकांचे नायक किंवा नायिका हरतऱ्हेचे प्रयत्न करताना दिसतात. परंतु वनात जाऊन राहिलं काय? किंवा सर्पाचे तुकडे केले तरी मरण टळताना दिसत नाही. 'प्रभू रामचंद्राच्या हातून मरण येइल' असे रावणासंदर्भातील सटवाईचे लेखन खरे ठरते. या संदर्भाची कथा कथाकल्पतरू (६/१६) ग्रंथात आली आहे. विधिलिखित त्रिकालात सत्य ठरते. हे साम्य वरील सर्वच आख्यायिकांच्या संहितातून दिसून येते. धर्मविधी, व्रते, पूजा यांच्याशी आख्यायिकांची नाळ जोडली गेल्याने भारतीय समाजामध्ये प्राचीन काळापासून त्यांचे स्थान अबाधित राहिले आहे.

### ३.३.४ ऐतिहासिक आख्यायिका :

प्राचीन इतिहासाच्या खाणाखुणा सांगणाऱ्या आख्यायिकांतून घटना प्रसंगाचे अवशेष रूप सापडते. मौखिक परंपरेने चालत आलेल्या आख्यायिकांत कल्पनेची असंख्य वलये कालपरत्वे, व्यक्तीपरत्वे उमटलेली दिसतात. माणकेश्वर येथे ही शिव मंदिरासंदर्भात अशा आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

'पूर्वी माणकेश्वर हे गाव बीबी साहेबां या अरब स्त्रीला जहागीर दिले होते. काही कारणांमुळे अरब व रोहिले यांचे तुंबळ युद्ध होऊन रोहिल्यांचा पराभव झाला. या दोघांच्या वैमनस्यामुळे निजामाने हे गाव खालसा केले. यवनांनी रागाच्या भरात आपला मोर्चा विश्वेश्वर मंदिराकडे वळविला. त्यांनी देवालयाच्या परिसरातील एकूण एक मूर्तीची तोडफोड करावयास सुरवात केली काही यवन नासधूस करण्याकरिता सभामंडपात घुसले, तर काही गाभाऱ्यात

शिरले. त्यांनी आपली हत्यारे पिंडीवर उगारली पण त्यांच्या डोळ्यासमोर एकाएकी अंधार पसरू लागला, अक्राळ विक्राळ नागांचे फणे दिसू लागले व त्यांचे फुत्कार ऐकू येऊ लागले. तीक्ष्ण त्रिशळांचा खणखणाट, विश्वेश्वराचे हे भयंकर रूप पाहून सर्वांनी धूम ठोकली. तेव्हापासून कोणीही दुष्ट त्या मंदिराकडे फिरकले नाहीत'[३३] अशी आख्यायिका संदीपान अंधारे यांनी सांगितली. प्राचीन मंदिरे उद्ध्वस्त करण्यामागे द्वेष, मत्सराबरोबरच हिंदू धर्म बाटवणे, लोकांनमध्ये धार्मिक परिवर्तन करणे, पूर्वीच्या देवदेवळामधील संपत्ती लुटणे, धर्माचे प्राचीन मूळ असणारी श्रद्धाकेंद्रे, सांस्कृतिक केंद्रे नष्ट करणे, समाजात दहशतीची, अस्थिरतेची भावना पसरवणे हे यौवनाचे हेतू असल्याचे दिसून येतात. यांचे पडसाद माणकेश्वर गावात तसेच शिवमंदिरावरील वास्तूवर पडलेले आजही दिसून येतात.

## ३.३.५ देवदेवताविषयक पौराणिक आख्यायिका :

प्रतिष्ठा प्राप्त लोकदैवताबरोबर गावोगावच्या ग्रामदैवताविषयी ही पौराणिक आख्यायिका आढळून येतात. त्रिपुरदाह, दक्षयज्ञविध्वंस, विषप्राशन, मदनदाह, अंधकासुरवध, लिंगोत्पत्तिकथा, ह्या कथांचा समावेश भारतीय संस्कृती कोशाच्या नवव्या खंडात आहे. 'शिव' देवतेविषयी रामायण, महाभारत, पुराणे, गुरूचरित्रग्रंथ, शिवलीलामृतात शेकडो कथा सापडतात. अशा वेगवेगळ्या दैवतकथांच्या माध्यमातून तत्कालीन लोकजीवन, सांस्कृतिक इतिहास अभ्यासता येतो. ग्रामीण भागाचा सांस्कृतिक ठेवा असणाऱ्या बेंदूर (बैल पोळा) प्रथेविषयीची आख्यायिका भागवत मसलकर यांनी सांगितली ती अशी -

'कैलास पर्वतावर शंकर व पार्वती सारीपाट खेळत असता पार्वतीने तो डाव जिंकला होता. मात्र, शंकराने मीच डाव जिंकला असा आग्रह धरला होता. हा वाद मिटेना तेव्हा पार्वतीने एकमेव साक्षीदार असलेल्या नंदीला डाव कोणी जिंकला, असा प्रश्न केला. मात्र नंदीने शंकराच्या बाजूने मान हलवताच रागावलेल्या पार्वतीने मृत्यलोकी तुझ्या मानेवर जोखड (जू) बसेल व तू जन्मभर कष्ट उपसशील, असा शाप दिला. भयभीत झालेल्या नंदीने उ:शाप

मागताच पार्वतीने शेतकरी वर्षातील एक दिवस तुझी पूजा करून मानेवर 'जू' ठेवणार नाहीत असा उ:शाप दिला. तेव्हापासून बेंदराची प्रथा सुरू झाली अशी आख्यायिका आहे.'[३४]

अनेक पौराणिक आख्यायिका, कथा, कहाण्यांमधून शिव-पार्वती सारीपाटाचा डाव खेळतात. विमानातून, नंदीवर बसून पृथ्वीवर येतात. कनवाळू पार्वतीच्या सांगण्यावरून शिव संकटग्रस्ताच्या मदतीला धावून जातो. कधी कधी मात्र भोळ्या सांबाच्या वरदानाने दैत्य उन्मत ही झालेले आढळतात. याउलट पार्वती दैत्याचे निर्दालन करते. याविषयीचे अनेक संदर्भ आख्यायिकांतून येतात.

'बाणासूर नावाचा दानव परम शिवभक्त होता. परंतु तो गर्विष्ठ बनला आणि त्रैलोक्याला पीडा देऊ लागला. शिवाने नारदामार्फत त्याची परीक्षा घेतली तरी तो अपयशी ठरला. मग शिवाने बाणासुरावर आक्रमण केले. आपल्या प्रजेवर आता संहार होणार हे त्याला कळाले. शिवाचा आघात सहन करून प्रजेला वाचवावे म्हणून त्याने 'शिवलिंग' मस्तकी धारण करून शिवाचे स्त्रोत गात पुढे झाला, त्याने शिवाला प्राथिले, 'तुझा कोप माझ्या माथी राहू दे, पण माझी प्रजा जगू दे' शिव त्याच्या प्रजावात्सल्याने प्रसन्न झाला. 'वर माग' म्हणाला बाणासुराने मागितले 'माझ्या हृदयी तुझी भक्ती अक्षयी राहू दे'[३५] प्रस्तुतच्या कथेची अनेक रूपे आज मौखिक स्वरूपात असली तरी ही कथा शेवटी दैवी सामर्थ्य विशद करणारी असून सदाचाराचे महत्त्व पटवते. कृष्णाने शंकरास शिरी वाहिल्याचा उल्लेख ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील २१४ ते २१८ ओव्यात आहे. महाराष्ट्रात तसेच भारतात जी काही लोकदैवते पूजली जातात ह्यांच्या मस्तकी आजही शिवलिंग असलेली दिसते. (उदा. बार्शीचा श्री भगवंत, तुळजापूरची भवानी, करमाळ्याची कमलाई, विठ्ठल, महालक्ष्मी इ.) शिवलिंग हे विश्वनिर्मितीचे कारण असून त्याची मनोभावे पूजा करून त्याद्वारे मोक्षप्राप्ती साधली जाते.

सटवाई निर्मितीची कथा ब्रह्मवैवर्त पुराणात (२.४३) आणि देवी भागवतात (९.४६) भारतीय संस्कृतिकोश (९) देवीकोश (३) यामध्ये सांगितल्या आहेत. सटवला, सटवीची

बाधा झालेला, सटवी पूजा, षष्ठिदेवता याविषयी अनुक्रमे दासबोध (५.२.६०), एकनाथी भागवत (२८.११४), ज्ञानेश्वरी (१८.८३७) दासबोध (१०.६.६४) या ग्रंथात माहिती आहे.

### ३.३.६ भगतांची गद्यपद्यमिश्रित आख्यायिका :

माणकेश्वर येथील शिव-सटवाई उत्सव आणि आख्यायिकांचा आढावा घेण्यासाठी लोकसंस्कृतीच्या उपासकांची खूपच मदत होते. शंकराची अवतार कथा, जेठा मुलाचा नवस, कोपराईची आख्यायिका, बळी परंपरा, जमगिरी बाबांचा मठ या संदर्भातील पोतराज सतीश क्षीरसागर यांनी सांगितलेली गद्यपद्यमिश्रित आख्यायिका अशी -

'पायाची पार्वती म्हणजे संभाची पार्वती.... संभाची पार्वती, पायाची पार्वती .... धंडाची लक्ष्मी .... ब्रह्माची सावित्री .... विष्णुची लक्ष्मी ..... महादेवाची पार्वती ..... अंगातनं अवतरली आणि ..... पाया बसून पार्वती झाली.

पार्वती मातेनं शूभ महादेवाला वरलं
धंडाची असणारी लक्ष्मी .... विष्णुनारायणाला बरलं
या शिराच्या सावित्रीनं .... सत्यली
'सत्यली म्हणजे ब्रह्म सटवाई'
काय म्हणतात -
ब्रह्माचा लेखा अन् सटवाईचं अक्षर
सटवाईन अक्षर टाकलं तर महाराज कुणाला चुकणार नाही बर का?

पण या ब्रह्म सटवाईनं मनाची इच्छा, पोटी नसताना बालक दिलेलं आहे. नवस काय बोलत होते की, 'मला प्रसन्न हो .... तुला जेठा मुलगा दाविन' जेठा म्हणजे पहिलं कोण कापणार हाय का हो...? नवस बोलती अशी बायकाची जात आहे. 'बायाची जात अन् कांद्याची पात' बाई बी तेवढी हुशार होती महाराज - देवाला आली नवस फेडायला.

आल्याबरोबर त्या माऊलीनं हशेन हुशेन बोलावले  आणि खिचडीत बोकड कालविले. या गावात अशी प्रथा होती की, नगरीमधून माणसं यायची तर धनगर असायची रानात. एका एका कडं खंडी खंडी मेंढरं असायची. त्यातलं एक बकरं वडायचं की कापायचं. ही बाई हुशार. हिनं बी तसाच विचार केला. देवी काय बघणारय का? त्यावेळी शंकर आणि पार्वती मंदिरात आसनात आहेत. अन् ही माऊली आली अन् हीनं नवस कसा फेडला. बकरं चोरलं अन् कापलं महाराज. बिनधास्त गोडव्याचा निवद दावला आता बकऱ्याचा दाखविते. मुलाला दर्शनाला ठेवले आहे. पाच प्रदक्षणा ह्या शंभू पार्वतीला घालत आहे.

बाईच्या मनात विकल्प आला. बाई एकलीच प्रदक्षणा घालत आहे आणि माझा मुलगा आहे पितांबर तिथं एकालाच आहे. पार्वती म्हणते, 'बघा महाराज'. शंभू ध्यानस्त होते. असं करा मी थोडा चमत्कार दावते. पार्वतीनं आक्रळविक्रळ रूप धारण केलं आन् त्या मुलाला तोंडामध्ये धरून कच्च कच्च खाल्लं.

चाविले ऽऽ

मुलाला आईने चाविले

आईनं ऽऽऽ

मुलाला खाईलं

बकरू जेटावं म्हणून, मूल धरलं तोंडात देवीनं चाविलं ऽऽ

आईनं मुलाला खाल्लं.

बाईच्या प्रदक्षिणा झाल्या. येऊन पाहेत तर काय, देवीच्या तोंडात मूल आहे. रक्ताच्या धारा वाहत आहेत. मूलं तोंडात अन् शंकराने डोळे उघडले. शंकर म्हणाले, 'अरे... अरे... पारबती हे काय केले' रागातच त्रिशूल उपासला अन् देवानं तिला कोचली. कोपऱ्यात घातल्याने महाराज कुपूर इथं. ही दर्शन कोपरीआई पूजा होय. असूर कुलदेवी तिथं राहणार नाही, हा वाडा म्हणजे तुलाच.'

मी राहतो तर मठावर

अंऽऽ मठावर ऽऽ

जमगिरी बाबाच्या मठावर

मल्लिकार्जुन नाथाची, नाथाची गेली स्वारी

माझ्या मलकासूरनाथाची

गेली... गेली.... स्वारी

सटवाबाई आली, आलो दर्शनासाठी

अन् माझ्या भर बांधवाची वटी'[३६]

अद्‌भुतता, कल्पनारम्यता, क्रौर्य यांचा मिलाप भगताच्या वरील आख्यायिकेत झालेला दिसून येतो. कोपराई पूजेविषयी लोकमानसाच्या मनात असणारी भीतीची भावना अनेक आख्यायिकातून, गीतातून चित्रीत झाल्याचे दिसून येते. परंतु प्रत्यक्ष त्या कोपराई प्रतिमेचे निरीक्षण केले असता मंदिराच्या भिंतीवर असणाऱ्या अनेक शिल्पापैकी ते एक आहे. अंधश्रद्धेने आज त्या मूर्तीची पूजा करून त्यावर शेंदूर फासून ही कोपराई पूजा लोकमानसात प्रसार आणि प्रचार पावताना दिसते. या पूजनीयत्वाची प्रेरणा प्रीती बरोबर भीतीची ही आहे. मातृत्व हे जसे रक्षक आहे; तसे ते भक्षक ही आहे अशी आदिम अवस्थेतील मानवाची धारणा होती. नवस नि:शंक मनाने फेडला नाही तर देवतेचा कोप होतो; अरिष्ट कोसळते या विधानाला पुष्टी देतच ह्या आख्यायिकाचा प्रवास सुरू असलेला दिसतो. दुसऱ्या वेळी नि:शंक मनाने मूल मंदिरात ठेवल्यावर दोन्ही मुले परत मिळाली. अशी प्रदेशपरत्वे साम्य असणाऱ्या आख्यायिका आढळतात.

### ३.३.७ नवसपूर्तीच्या आख्यायिका :

देवदेवता नवसास पावतात या लोकश्रद्धेमुळे नवस संकल्पनेला धार्मिक दृष्ट्या लोकजीवनात महत्त्वाचे स्थान आहे. भक्ताने स्वत:च्या मनोकामना, अपेक्षा, इच्छा पूर्तीसाठी

परमेश्वरास मनोभावे केलेली प्रार्थना म्हणजे नवस. प्रचिती सकारात्मक आल्यास दिलेल्या वचन पूर्तीसाठी जागृत राहून अमूकतमूक गोष्ट करण्यासंबंधी देवीबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजे नवस फेडणे होय. नवसपूर्ती करणे हे स्वत:च स्वेच्छेने स्वीकारलेले नैतिक, धार्मिक बंधन असते.

माणकेश्वरच्या सटवाई या जागृत देवस्थानासंबंधी नवसपूर्तीच्या बऱ्याच आख्यायिका भक्ताच्या तोंडी असल्याचे दिसते. बोडका, ता. परांडा येथील सरूबाई खवले ह्यांनी सांगितलेली आख्यायिका अशी -

'एका गावामध्ये एक गरीब कुटुंब होतं. त्या कुटुंबात नवरा, बायको त्यांचा मुलगा अन् एक मुलगी राहत होती. त्या मुलीला चांगल्या घरी दिलेलं असतं. भाऊ शाळा नसन तवा कामाला जात असे; घरची गरीबी असल्यामुळे 'काम करीन तवा खाईन' अशीच अवस्था होती.

बऱ्याच दिवसानं गावातील एका बाईनं तुमच्या मुलीला दिवस गेल्याचे सांगितले. परंतु घरची परिस्थिती चांगली नसली तरी बहिणीच्या ओढीनं भाऊ आणायला जातो. भावाला आपली ताई कुठे राहते हे माहित नसते. समोर असणारा टोलेजंग वाडा ताईचाच असतो. घरी गेल्यावर बहिणीचे सासू-सासरे त्याला ओळखत नाहीत. बहीण आल्यावर आपल्या भावाला ओळखते. भावाच्या हट्टामुळे सासरची मंडळी तिला माहेरी पाठवतात.

माहेरी येताना वाटेत एक सटवाईचं देऊळ असतं. ती सटवाईच्या पाया पडायला जाते. पाया पडते अन् नवस बोलते, 'माझ्या भावाची गरिबी जाऊ दे, चांगल झाल्यावर मला झालेलं मूल तुला देईन.' आणि बैलगाडीत बसून माहेरला येते. घरी आल्यावर चहा करायला दूध-साखर नसते. त्यामुळे गाडीवान पाणी पिऊन जातो.

लवकरच तिचं बाळंतपण होतं. तिला चांगला सुंदर व गुटगुटीत मुलगा होतो. सासरची

मंडळी बघायला येतात. एके दिवशी तिला शिळ्या भाकरीचं तुकड लय खाऊ वाटतात; म्हणून ती आईला शिळ्या भाकरीचं तुकडं करायला लावते. आई तुकडं घ्यायला जाती तर त्याचं सोनं व्हतं. त्यातलं थोडं सोनं आपल्या भावाला देऊन बाजार अन् घर निट करायला सांगते.

बाळाचं नाव ठेवलं जातं. भाऊ भाच्याला सोन्याचं ताईत घालतो आणि नंतर बहिणीला वाटं लावतो. जाताना बहीण सटवाईच्या पाया पडायला जाते व मुलाला सटवाईजवळ सोडून देते. रात्रीच्याला घरी (सासरी) बायांना शिदोरी सोडायला बोलवतात. 'आगं, शिदोरी झाली, समदं झालं पण माझा नातू दाखव की आदी? ती म्हणते, 'आताच झोपला. उद्यापासून तुम्हीच बघणार आहात की.'

रातच्याला झोपल्यावर बाळ घरी रडत येते. तवा सासू उठती आणि सुनेला हाक मारती. ते पाहून ती एकदम आश्चर्य चकीत होती अन् मुलाला छातीला कवटाळून घेते. अन् रडू लागते'[३७]

लेकीच्या पायी भावाच्या घरी श्रीमंती आलेली दिसून येते. दिला शब्द पाळणारी मुलगी जेव्हा सासरी जाते तेव्हा तिथल्या परिस्थितीचं वर्णन बोलकं आहे. बालक सुखरूप परत येण्यातून सटवाई ह्या बालसंरक्षक असल्याचा ठसा मनावर उमटतो. वडिलांची भूमिका अदृश्य असून सासरची मंडळी प्रेमळ असल्याचे दिसून येते. मुक्ताबाई सोमनाथ घोडके यांनी कंत्राटदारा विषयीची सांगितलेली आख्यायिका अशी-

'एक कंत्राटदार सटवाईच्या दर्शनासाठी माणकेसर येथे आला होता. लग्न होऊन बरीच वर्षे झाली तरी त्याला मूल बाळ व्हतं नव्हतं. तो सटवाईला म्हणाला, 'मला मूल होऊ दे, मी फाट्यावरून (वारदवाडी भूम रस्त्यावरील माणकेश्वर फाटा ते माणकेश्वर दरम्यान तीन कि. मी. अंतर आहे.) जी रोड आणतो ती तुझ्या दरबारापर्यंत, डांबरी रोड करतो. मग सटवाई त्याला पावली त्याला पाच मुल झाली व त्यानं हौसेने रोड केला'[३८]

देवीच्या सत्वाचा खरा प्रत्यय आला, अनुभव आला की तेथे देवाचे देऊळ बांधणे, मंदिर जीर्णोद्धार करण्याची प्रवृत्ती भक्तांच्या मनात सहजच निर्माण होतात दिसते. सटवाईने सांगितलेला शब्द पाळणारी बहीण भावाला 'मेल्या मुडद्या' संबोधित कशी प्राण वाचवते याविषयीची संगीता पाटील यांनी सांगितलेली आख्यायिका अशी -

'मुलगा झाला की सटवाई रडवायची. रडून रडून मूल मारायची. आपल्या नुकत्याच जन्मलेल्या भावाला सटवाई कशी मारते ते बघण्यासाठी बहीण दारातच बसून राहते. योगायोगाने ती तिला दिसली. म्हणाली, 'अक्षर टाकायला आली असचील तर चांगलं टाक, नाहीतर परत माघारी जा' सटवाई म्हणते, मी चांगला शब्द टाकते, पण मी सांगते ते केलं पाहिजे, ती मुलगी म्हणाली काय हरकत नाही. फक्त त्या मुलाला 'मेल्या मुडऽऽद्या म्हणून हाक मारायची.' नावानं त्याला हाक मारायची नाही. मी हे जे सांगितले ते तू मेलं तरी कुणाला सांगायचं नाही. सगळी म्हणायची नवसानं मुलं झालं अन् ही पोरगी 'मेल्या मुडऽऽद्या' म्हणती. लग्न ही जमलं पण अक्षता टाकायच्या वक्ताला दोन पोती गवऱ्या (शेणाच्या गवऱ्या) गोळा करायला सांगितल्या. नवरा-नवरीच्या मध्ये मोठा ढिग घातला. कसा माझा भाऊ वाचत नाही तेच बघते. सगळी पाहुणे रावळे म्हणाली, 'मुलगी येडी झाली.' नाग मांडवावर आला. तो नाग चावून भाऊ मरणार व्हता म्हणून जाळ केला. 'मला तुम्ही येडी म्हणायचात, माझा भाऊ मरला असता. यामुळंच त्याला मी मेल्या मुडद्या म्हणायची'[३९]

आख्यायिकेतील अद्‌भुत घटना, कृती आणि प्रसंग, चमत्काराच्या कल्पनाबंधातून अतिशयोक्तीपूर्ण गुंफलेले असल्यामुळे या आख्यायिकांना कथा असेच संबोधावे लागते 'अद्‌भुत कथेत नायक किंवा नायिका कथेतील मध्यवर्ती व्यक्ती असते. त्या व्यक्तिभोवती अनेक पराक्रमाची, चमत्काराची किंवा प्रसंगाची उभारणी झालेली असते'[४०] 'मेल्या मुडऽऽ द्या' आख्यायिकेत बहिणीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा असलेली दिसते. उत्कंठावर्धक प्रसंगाच्या उभारणीतून आणि विचित्र वागण्यातून संकट टळल्याचा संदेश असंभाव्य गोष्टीच्या माध्यमातून

भक्तांपर्यंत पोहचताना दिसतो. कथेतून कोणताही नीतिबोध मिळत नसला तरी लोकात या कथेविषयी आवड असल्याचे दिसते. आख्यायिकांचा शेवट सुखात्म केलेला असला तरी मुख्य प्रयोजन धार्मिकते बरोबरच मनोरंजन ही असते.

एखाद्याला इच्छित गोष्ट मिळाली की, 'देवी नवसाला पावते बरं का?' असा प्रचार, प्रसार भक्तच करताना दिसतो. आपल्या पाठीशी देवीची कृपा असल्यामुळे भक्ताला मानसिक मनोधैर्य, आत्मबल लाभते. चिकाटी धरून कोणतेही काम केल्याने यशाची दारे आपोआपच उघडी होतात हेच खरे सत्य होय.

## ३.४ लिपीबद्ध कथा, आख्यायिका :

याशिवाय 'शिव' देवतेसंदर्भात 'शिव-पार्वती की हार', 'गंगा मुझे क्या दिया', 'शाल की चिन्ता', 'शिवरात्रि का पारण' या लोककथांचा उल्लेख 'कन्नड लोककथाएँ' ह्या अनुवादित पुस्तकात आढळतो. पुराण ग्रंथ वाङ्मयात या विषयीच्या कथा लिपिबद्ध झाल्या आहेत.

सटवाईच्या वरील आख्यायिकांच्या व्यतिरिक्त बार्शी येथील लेखक प्रकाश गव्हाणे यांच्या 'होरपलेले पाय' या कथासंग्रहातील 'काळीज' शीर्षकाच्या कथेत माणकेश्वरच्या सटवाईचा उल्लेख आढळतो. खेड्यातील कुटुंब व्यवस्थेमध्ये अंधश्रद्धेने येणारी अस्वस्थता लेखक 'काळीज' या कथेमध्ये व्यक्त करतो. लेखकाच्या रडण्याने गोंधळाने, आईला शेलगावच्या मामीकडून शिव्या खाव्या लागतात मामी म्हणते, 'मला दोन पोरींच्या पाठीवर ह्या सटवाईच्या नवसानं पोरगं झालं तो नवस फेडायला आम्ही आज आलो तर तुझ्या ह्या गाबड्यानं असला तमाशा केला'[४१] माणकेश्वरच्या सटवाईचा नवस फेडायला हरण्या नावाच्या बोकडाचा बळी दिला जावा हे धक्कादायक कृत्य लेखकाला अमानवी वाटते.

'सटवाईची अक्षरे' या विषयीच्या महाराष्ट्र लोकसाहित्य माल, पुष्प तिसरे मधील

'सटवी ब्रह्माची कहाणी', 'सटवीची कथा' तसेच 'खाणदेशी लोकसाहित्य' या संपादित पुस्तकातील 'सटीन टाक' या कथांचे नायक-नायिका दोघेही शेवटी आत्महत्या करताना आढळतात. डॉ. विश्वनाथ शिंदे सरांच्या लघुसंशोधन प्रकल्पात असणारी 'सटवाईची कथा' याबरोबरच 'लोण्याची सटवाई' ही महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पुष्प दुसरे मधील संकलित कथांत आत्महत्यांचा उल्लेख कुठेच येत नाही सदर प्रबंधिकेत संकलित कलेल्या सटवाईच्या अनेक आख्यायिकात सुद्धा आत्महत्यांचा कुठे लवलेशही सापडत नाही. सटवाईचे विधिलिखित हे नेहमी त्रिकालाबाधित सत्यच ठरते हाच संदेश आख्यायिकांचा असल्याचे दिसून येते.

## ३.५ समारोप :

माणकेश्वरच्या शिव - सटवाई संदर्भातील विविध आख्यायिकांच्या आशयाचे स्वरूप विभिन्न प्रकारचे आहे. आख्यायिकातील संपूर्ण माहिती वास्तवावर आधारलेली आहे. असे नसून आख्यायिकांच्या मूळाशी काही एक प्रमाणसत्य कल्पावगुंठीत स्वरूपात असल्याचे जाणवते. वरील आख्यायिकातून त्या त्या परिसरातील घटना, इतिहास, भूगोल, निसर्ग, लोकमानस, लोकजीवन, विश्वास, रूढी, परंपरा, समजुती, विधीप्रथा, बोलीभाषा, दैवतासंबंधीच्या कल्पना, सांस्कृतिक, धार्मिक संकल्पना याचे चित्रण आढळते. लोकभाषेच्या वापरामुळे ग्रामीण बोलीच्या अनेक खाणाखुणा आख्यायिकातून जपलेल्या दिसतात. कथनकाराच्या प्रतिमा शक्तीनुसार आख्यायिकेत कल्पनाविलास, अतिशयोक्तीपूर्ण वर्णने, अद्‌भुतरम्यता घटनाप्रसंग घुसडले असले तरी त्याच्या तळाशी अंशरूपाने का होईना वास्तव (सत्य) दडलेले असते.

वरील आख्यायिकांचे आवलोकन केल्यास माणकेश्वर हे ठिकाण धार्मिक परंपरांशी, लोकदेवतांशी बांधले गेले असून गावची प्राचीन संस्कृती, रूढी, प्रथा, पूजाविधी यांचा एकविसाव्या शतकात देखील वर्तमानकालीन लोकजीवनांवर प्रभाव असल्याचे जाणवते.

## संदर्भ आणि टीपा

१. डॉ. विश्वनाथ शिंदे, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृ. १३६.

२. Linda Degh, 'Folk - harrative' an artical included in 'Folk -loreand Folk life' Edited by Richard M. Dorson, Page 60-65.

३. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती तिसरी, १९९५, पृ. २१२.

४. वा. गो. आपटे, विस्तारित शब्द रत्नाकर, पृ. ३९.

५. लक्ष्मणशास्त्री जोशी, (संपा.) मराठी विश्वकोश, खंड-१, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, प्रथम प्रकाशन, १९७६, पृ. ९०२.

६. प्रभाकर मांडे, उनि. पृ. १९८.

७. दुर्गा भागवत, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स, मुंबई, १९७७, दुसरी आवृत्ती, पृ. २५२.

८. रोहिदास हेळकर, देवंग्रा, ता. भूम, ह्यांनी सांगितलेली आख्यायिका.

९. रावसाहेब गटकळ, आंबी, ता. भूम, चर्चेदरम्यान मिळालेली आख्यायिका.

१०. जयवंतराव साळगावकर व इतर, (संपा.) 'भारतीय इतिहास आणि संस्कृती' त्रै. व. ३६, पु. १४१, १९९९, पृ. २४.

११. दत्ता बेडके, ता. कळंब, ह्यांनी सांगितलेली आख्यायिका.

१२. अमर देशमुख, तुळजापूर ह्यांनी प्रवासादरम्यान सांगितलेली आख्यायिका.

१३. प्रदीप इंगळे, तेर (ढोकी) यांनी दिलेली माहिती.

१४. अनुसया गुरव, माणकेश्वर, यांनी आख्यायिका सांगितली.

१५. राजश्री हांडे, देवंग्रा, ता. भूम, यांची ध्वनिमुद्रित केलेली आख्यायिका

१६. अश्रू बन्सी तेलंग, माणकेश्वर, ह्यांची ध्वनिमुद्रित आख्यायिका

१७. रा. चिं. ढेरे, लोकदैवताचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. १०२.

१८. सुरेश जगदाळे, माणकेश्वर, ध्वनिमुद्रित मुलाखत.

१९. किसन अंधारे, माणकेश्वर, यांनी सांगितलेली माहिती.

२०. मुक्ताबाई सोमनाथ घोडके, माणकेश्वर, ध्वनिमुद्रित केलेली आख्यायिका.

२१. काशिबाई आबासोा हांडे, देवंग्रा, ता. भूम यांची शेतात काम करताना ध्वनिमुद्रित केलेली मुलाखत.

२२. वसंत धोंडीबा शिंदे, तांबेवाडी, ता. भूम ह्यांची ध्वनिमुद्रित केलेली आख्यायिका.

२३. आण्णासो अंधारे, माणकेश्वर, यांच्या किराणा दुकानात बसून केलेल्या चर्चेतून मिळालेली माहिती.

२४. नानासोा जोशी, बार्शी, ह्यांच्याकडून मिळालेली आख्यायिका

२५. संजीवनी हिंगे, ता. भूम, जि. उस्मानाबाद यांनी सांगितलेली माहिती.

२६. प्रभाकर मांडे, उनि., पृ. १७९.

२७. डॉ. विश्वनाथ शिंदे, 'मराठी दंतकथांचा सामाजिक दृष्टिने अभ्यास' Minor Research Project, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ९४ ते ९६, पृ. ३९.

२८. जनाबाई इतापे, लोणी, ता. परांडा, यांची ध्वनिमुद्रित केलेल्या आख्यायिका.

२९. डॉ. सर्जेराव साळुंखे, समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे-२, १९९६, पृ. १७२.

३०. कौशल्या बाबासोा शिंदे, रा. शिराळा, ता. परांडा ह्यांची ध्वनिमुद्रित आख्यायिका.

३१. सौ. वैद्यही कोळेकर, मराठी लोककथा स्वरूपमीमांसा, सविता प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, पृ. २०३.

३२. सुमन थोरात, ता. परांडा, चर्चेदरम्यान मिळालेली आख्यायिका.

३३. संदीपान अंधारे, माणकेश्वर, यांनी सांगितलेली आख्यायिका.

३४. भागवत मसलकर, वांगी, ता. भूम यांनी सांगितलेली माहिती.

३५. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश, खंड नववा, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७६, पृ. ३११.

३६. सतीश लक्ष्मण क्षीरसागर, ह्यांची ध्वनिमुद्रित आख्यायिका.

३७. सरूबाई खवले, रा. बोडका, ता. परांडा, यांच्याकडून मिळालेली आख्यायिका.

३८. मुक्ताबाई सोमनाथ घोडके, माणकेश्वर, ह्यांची ध्वनिमुद्रित माहिती.

३९. संगीता पाटील, गोलेगाव, ता. भूम ह्यांच्याकडून मिळालेली आख्यायिका.

४०. दुर्गा भागवत, उनि., पृ. ४१.

४१. प्रकाश गव्हाणे, होरपळलेले पाय, मृद्‌गंध प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १९९९, पृ. १६.